# महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ
## साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११००५

दूरध्वनी : ०२०-२९७०३२२८ ई-मेल : info@mahanhm.in


जाक्र.मराफऔवमं/कांदाचाळ/मा.सु/3८0५9 /२३
पुणे-५, दि. ०५/१२/२०२३

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक
-----------------(सर्व)

२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
-----------------(सर्व)

**विषय - सन २०२३-२४ एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत काढणीत्तोर व्यवस्थापनांतर्गत कमी खर्चाचे कांदा साठवणुक गृह / कांदाचाळ या घटकाच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सुचना...**

**संदर्भ** - राज्यस्तरीय कार्यकारी समितीचे दि. ९ जुन, २०२३ रोजी झालेल्या सोळाव्या बैठकीचे इतिवृत्त दि.१३/०६/२०२३.

राज्यात कांदा पिकाचे उत्पादन मोठया प्रमाणात होत असून शेतकरी सर्वसाधारणपणे कांदा जमिनीवर पसरवुन ठेवून किंवा स्थानिकरित्या तयार केलेल्या चाळीमध्ये कांद्याची साठवणूक करतात. त्यामुळे कांदा सडून मोठया प्रमाणावर नुकसान होते. तसेच कांद्याची प्रत व टिकाऊपणा यावर विपरीत परिणाम होतो. शास्त्रशुध्द कांदाचाळ उभारणीमुळे कांद्याची योग्य गुणवत्ता राखली जाऊन शेतकऱ्यांना अधिक नफा मिळत असल्याने कांदाचाळ उभारणीकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे.

सध्यस्थितीत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान ही योजना महाडीबीटी पोर्टलवर राबविण्यात येत असून सदर योजनेच्या मार्गदर्शक सुचना सन २०१८-१९ मध्ये निर्गमित करण्यात आलेल्या होत्या. योजना अंमलबजावणीकरीता महाडीबीटी वर्क फ्लो सन २०२३ मध्ये कार्यान्वित करण्यात आलेले असून त्याप्रमाणे मार्गदर्शक सुचना क्षेत्रिय स्तरावर उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

उपरोक्त संदर्भान्वये राज्यस्तरीय कार्यकारी समितीचे दि. ९ जुन, २०२३ रोजी झालेल्या सोळाव्या बैठकीमध्ये महा-डीबीटीवर घटकनिहाय सुधारित वर्क फ्लो कार्यान्वित करणे व आवश्यकतेनुसार मार्गदर्शक सुचनांमध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने मार्गदर्शक सुचनांमध्ये बदल करण्यात आलेले आहेत. त्यानुसार काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत कमी खर्चाचे कांदा साठवणूक गृह/ कांदा चाळ ( Low cost onion storage structure ) या घटकाच्या सविस्तर मार्गदर्शक सुचना (सन २०२३-२४) सर्व जिल्ह्यांना अंमलबजावणी करीता निर्गमित करण्यात येत आहेत. तरी, सर्व जिल्ह्यांनी मार्गदर्शक सुचनेचे पालन करावे. सदरच्या मार्गदर्शक सुचना कृषि विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in तसेच www.mahanhm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

(डॉ.के.पी.मोते)
**संचालक,**
**महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि**
**औषधी वनस्पती मंडळ, पुणे.**

**प्रत:-** १. मा. अध्यक्ष, मराफऔवम तथा सचिव (कृषी), महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. कृषि उपसंचालक, आयुक्त कक्ष, कृषि आयुक्तालय पुणे- ४११००१ यांना माहितीस्तव.

जाक्र.मराफऔवमं/कांदाचाळ/मा.सु/३८०५१ /२३
पुणे-५, दि. ०५ /१२/२०२३

# कमी खर्चाचे कांदा साठवणूक गृह/ कांदा चाळ

# मार्गदर्शक सुचना

# सन २०२३-२४

Maharashtra State Horticulture & Medicinal Plants Board, Pune

# कमी खर्चाचे कांदा साठवणुक गृह / कांदा चाळ

## ( Low cost onion storage structure )

**१. प्रस्तावना :-**

राज्यात कांदा पिकाचे उत्पादन मोठया प्रमाणात होत असून शेतकरी सर्वसाधारणपणे कांदा जमिनीवर पसरवुन ठेवून किंवा स्थानिकरित्या तयार केलेल्या चाळीमध्ये कांद्याची साठवणूक करतात. त्यामुळे कांदा सडून मोठया प्रमाणावर नुकसान होते. तसेच कांद्याची प्रत व टिकाऊपणा यावर विपरीत परिणाम होतो. शास्त्रशुध्द कांदाचाळ उभारणीमुळे कांद्याची योग्य गुणवत्ता राखली जाऊन शेतकऱ्यांना अधिक नफा मिळत असल्याने कांदाचाळ उभारणीकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे.

**अर्थसहाय्याचे स्वरुपः-**

५,१०,१५,२० व २५ मे.टन क्षमतेच्या कांदा चाळी उभारणीसाठी येणाऱ्या खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु.३५०० प्रति मे.टन याप्रमाणे क्षमतेनुसार अर्थसहाय्य देय राहील.

**२. योजनेचा उद्देश :-**

१. कांदा पिकाचे साठवणूकीत होणारे नुकसान कमी करणे.

२. कांदा पिकाची हंगामामध्ये आवक वाढुन कांदयाचे भाव कोसळणे तसेच हंगामाव्यतिरीक्त कांदयाचा तुटवडा निर्माण होऊन भाव वाढणे अशा समस्येवर अंशतः नियंत्रण मिळविणे.

**३. लाभार्थी निवडीचे निकष :-**

३.१.शेतकऱ्याने योजनेअंतर्गत अर्ज करताना त्यांच्या स्वतःच्या मालकीची जमीन असणे आवश्यक आहे. ७/१२ वर कांदा पिकाची नोंद असणे आवश्यक आहे.

३.२. शेतकऱ्याकडे कांदापिक असणे बंधनकारक आहे.

३.३. सदर योजनेचा लाभ वैयक्तिक कांदा उत्पादक शेतकरी, शेतकऱ्यांचा गट, स्वयंसहायता गट, शेतकरी महिला गट, शेतकऱ्यांचे उत्पादक संघ (Farmers Producer Organizations), नोंदणीकृत शेतीसंबंधी संस्था, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, सहकारी पणन संघ यांना घेता येईल.

**४. अर्ज करण्याची पध्दत :-**

शेतकऱ्यांनी https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करणे आवश्यक राहील.

Maharashtra State Horticulture & Medicinal Plants Board, Pune

## छाननी वर्कफ्लो :-

शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज केल्यानंतर संबंधितांची ऑनलाईन पध्दतीने सोडतीमध्ये निवड झाल्यानंतर संबंधितांना अर्ज करावयाच्या वेळेस नोंदणी केलेल्या दुरध्वनी क्रमांकावर संदेश प्राप्त होतो. सोडतीमध्ये निवड झाल्यानंतर पुढील वर्कफ्लो प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

| **कागदपत्रे व बिले सादर करणे** | **कागदपत्रे व मोका तपासणी अहवाल छाननी** | **सविस्तर प्रकल्प अहवाल छाननी** | **बिले व मोका तपासणी** |
|---|---|---|---|

१. शेतकरी :- पुर्वसंमतीकरीता लागणारी कागदपत्रे अपलोड करणे →

२. कृषि सहाय्यक :- मान्यतापुर्व स्थळपाहणी अहवाल (प्रपत्र - १) अपलोड करणे ↓

३. मंडळ कृषी अधिकारी :- मान्यतापुर्व स्थळपाहणी अहवालाची पडताळणी करणे ↓

४. तालुका कृषी अधिकारी :- मान्यतापुर्व स्थळपाहणी अहवालाची पडताळणी करून पुर्वसंमतीसाठी मंजुरी देणे ↓

५. पुर्वसंमती प्रणालीद्वारे स्वयंचलित पध्दतीने मिळेल (प्रपत्र - ४) ←

६. शेतकरी :- देयके अपलोड करणे →

७. मंडळ कृषी अधिकारी :- मोका तपासणी अहवाल (प्रपत्र- ५), मापन पुस्तिका नोंद अहवाल (MB Recording) अपलोड करणे ↓

८. तालुका कृषि अधिकारी :- देयके, मोका तपासणी व मापन पुस्तिका नोंद अहवालांची तपासणी करणे ↓

अनुदान वितरणास मान्यता ↓

९. कृषि उपसंचालक (राज्य) (Generate RFT) ↓

१०. आहरण व संवितरण अधिकारी (जिल्हा) :- पीएफएमएस प्रणालीद्वारे अनुदान वितरण

Maharashtra State Horticulture & Medicinal Plants Board, Pune

# <u>कांदाचाळ या घटकाची उभारणी करण्याकरीता कालमर्यादा व कार्यपद्धती.</u>

| अ.क्र. | बाब | कालमर्यादा |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज करणे | लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्याने (प्रवर्तकाने) एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान व राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत कांदाचाळ उभारणीकरीता लाभ घेण्यासाठी <u>https://mahadbt.maharashtra.gov.in</u> या संकेतस्थळावर अर्ज करावा. |
| २ | सोडत (लॉटरी) काढणे | प्राप्त अर्जांची संकेतस्थळावरून आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत जिल्हा / तालुका स्तरावर तालुका निहाय सोडत काढणे. लक्षांकाप्रमाणे सोडतीमध्ये निवड झालेबाबत संबंधितांना अर्ज करावयाच्या वेळेस नोंदणी केलेल्या दुरध्वनी क्रमांकावर संदेश प्राप्त होईल. |
| ३ | लाभार्थीने कागदपत्रे अपलोड करणे | सोडतीमध्ये निवड झाल्यानंतर प्रवर्तकाने जागेच्या मालकी हक्काची कागदपत्रे (७/१२ आणि ८ अ), आधारकार्ड ची छायांकित प्रत, बँक खात्याचा तपशील, हमीपत्र (प्रपत्र - २ ) व बंधपत्र (प्रपत्र -३) हे संबंधित कृषि सहाय्यक यांच्या डेस्कला **१५ दिवसांत** सादर करावे. |
| ४ | मान्यतापुर्व स्थळपाहणी **(प्रपत्र- १)** | संबंधित कृषि सहाय्यक यांनी मान्यतापुर्व स्थळपाहणी (प्रपत्र-१ प्रमाणे) **१५ दिवसांत** करावी. मान्यता पुर्व स्थळपाहणी अहवालासह इतर कागदपत्रे मंडळ कृषी अधिकारी यांच्या डेस्कला पाठवावे. मंडळ कृषी अधिकारी यांनी सदर कागदपत्रांची पडताळणी करून योग्य प्रस्ताव तालुका कृषी अधिकारी यांच्या डेस्कला सादर करावेत. |
| ५ | पुर्वसंमती पत्र देणे (Pre-Sanction) **(प्रपत्र ४)** | प्रवर्तकाने सादर केलेल्या कागदपत्रांची व मान्यतापुर्व स्थळपाहणी अहवालाची पडताळणी करून तालुका कृषी अधिकारी यांनी प्रवर्तकास पुर्वसंमती (प्रपत्र ४) महाडीबीटी प्रणालीद्वारे ऑनलाईन स्वयंचलित पध्दतीने **१५ दिवसांत** निर्गमित करावी. |
| ९ | देयके अपलोड करणे | पुर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर **दोन महिन्यांच्या आत** प्रकल्प उभा करणे प्रवर्तकास बंधनकारक राहील. प्रर्वतकाने प्रकल्प उभारणी पुर्ण झाल्यानंतर देयके मंडळ कृषि अधिकारी यांच्या डेस्कला सादर करावीत. |
| १० | प्रकल्प उभारणीपश्चात मोका तपासणी **(प्रपत्र - ५ )** व MB Recording करणे | प्रर्वतकाकडून मंडळ कृषि अधिकारी यांच्या डेस्कला देयके प्राप्त झाल्यानंरत **१५ दिवसांत** त्यांनी प्रत्यक्ष प्रकल्प स्थळावर जाऊन मोका तपासणी करून मापन पुस्तिकेमध्ये नोंदी घेऊन अहवाल तालुका कृषी अधिकारी यांच्या डेस्कला सादर करावेत. |
| ११ | अनुदान वितरण करणे | तालुका कृषी अधिकारी यांनी अनुदान अदायगीकरीता केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या मान्यतेने पीएफएमएस प्रणालीद्वारे अनुदान वितरण करण्यात यावे. |

५. <u>अमंलबजावणीची कार्यपध्दती :-</u>

**५.१. संकेत स्थळावर अर्ज करणे -** लाभ घेण्यासाठी इच्छुक असणाऱ्या प्रवर्तकांनी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान व राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत कांदाचाळ उभारणीकरीता https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करावी. नोंदणी करतानाच जमिनीच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे, आधार कार्ड, संवर्ग प्रमाणपत्र (अनूसूचित जाती व अनुसुचित जमाती शेतकऱ्यांसाठी) महाडीबीटी संकेत स्थळावर अपलोड करावेत. कृषि सहाय्यक यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील इच्छूक लाभार्थी शेतकऱ्यांना महाडीबीटी पोर्टल या ऑनलाईन संकेतस्थळावर नोंदणी करण्याबाबत मार्गदर्शन करावे.

**५.२. सोडत (लॉटरी) काढणे** - कांदाचाळ उभारणीसाठी महाडीबीटी प्रणालीवरील अर्जांची ऑनलाईन पध्दतीने आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत जिल्हा / तालुका स्तरावर सोडत काढण्यात येईल. सोडतीमध्ये निवड झाल्यानंतर संबंधितांना अर्ज करावयाच्या वेळेस नोंदणी केलेल्या दुरध्वनी क्रमांकावर संदेश प्राप्त होईल.

**५.३. मान्यता पुर्व स्थळपाहणी (प्रपत्र - १)-** सोडतीमध्ये निवड झाल्यानंतर प्रवर्तकाने जागेच्या मालकी हक्काची कागदपत्रे (७/१२ आणि ८ अ), आधारकार्ड ची छायांकित प्रत, बँक खात्याचा तपशील, हमीपत्र (प्रपत्र - २) व बंधपत्र (प्रपत्र - ३) हे संबंधित कृषि सहाय्यक यांच्या डेस्कला **१५ दिवसांत** सादर करावे.

१. GPS प्रणालीद्वारे प्रकल्प स्थळाचे भौगोलिक स्थान निश्चित करण्यात यावे.

२. अर्जदार/प्रतिनिधी व कृषि सहाय्यक यांचे समवेत अक्षांश व रेखांशसह (Geotagging) फोटो घेण्यात यावा.

३. कांदाचाळ उभारणीचे स्थळ, मालकी व क्षेत्र इ. बाबत पडताळणी करावी.

४. मान्यतापुर्व स्थळपाहणीवेळी कोणत्याही स्वरूपाचे कांदाचाळीची उभारणी सुरू/ अर्धवट/पुर्ण आढळून आल्यास अर्ज त्याच स्तरावर रद्द / निकाली काढण्यात यावेत.

५. संबंधित कृषि सहाय्यक यांनी वरीलप्रमाणे पडताळणी करून् मान्यतापुर्व स्थळपाहणी अहवाल व प्रवर्तकाने सादर केलेली कागदपत्रे मंडळ कृषी अधिकारी यांच्या डेस्कला पडताळणी करीता सादर करावेत. तद्नंतर मंडळ कृषी अधिकारी यांनी पडताळणी करून योग्य प्रस्ताव तालुका कृषी अधिकारी यांच्या डेस्कला पुर्वसंमती मिळणेकरीता सादर करावेत.

६. संबंधित कृषि सहाय्यक यांनी शेतकऱ्यांना योजनेच्या अटी व शर्ती तसेच कांदाचाळ उभारणीबाबतचे आराखडे व तांत्रिक मापदंड समजावून सांगावे.

**५.४. पुर्वसंमती देणे (प्रपत्र - ४) -** तालुका कृषी अधिकारी यांनी मान्यता पुर्व स्थळपाहणीच्या आधारे आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत पुर्वसंमती **(प्रपत्र - ४)** महाडीबीटी प्रणालीद्वारे ऑनलाईन स्वयंचलित पध्दतीने १५ दिवसांत देण्याबाबतची कार्यवाही पुर्ण करण्यात यावी.

**५.५ देयके अपलोड करणे -** पुर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर दोन महिन्यांच्या आत प्रकल्प उभा करणे प्रवर्तकास बंधनकारक राहील. प्रर्वतकाने कांदाचाळीची उभारणी पुर्ण झाल्यानंतर देयके मंडळ कृषि अधिकारी यांच्या डेस्कला सादर करावे. **पुर्वसंमती पत्र निर्गमित केलेल्या पत्राच्या संदर्भीय दिनांकापासून दोन महिन्याच्या आत देयके मंडळ कृषी अधिकारी यांच्या डेस्कला सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा कांदाचाळ या घटकाची पुर्वसंमती संगणकीय प्रणालीद्वारे रद्द होईल.**

Maharashtra State Horticulture & Medicinal Plants Board, Pune

**५.६. प्रकल्प उभारणीपश्चात मोका तपासणी (प्रपत्र - ५) व MB Recording करणे** - प्रर्वतकाकडून मंडळ कृषि अधिकारी यांच्या डेस्कला देयके प्राप्त झाल्यानंतर **१५ दिवसांत** त्यांनी प्रत्यक्ष प्रकल्प स्थळावर जाऊन मोका तपासणी करून मापन पुस्तिकेमध्ये नोंदी घेऊन अहवाल तालुका कृषी अधिकारी यांच्या डेस्कला सादर करावेत.

**५.७. अनुदान वितरण करणे** - तालुका कृषी अधिकारी यांनी अनुदान अदायगीकरीता केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या मान्यतेने योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कमाल अनुदान पीएफएमएस प्रणालीद्वारे वितरीत करावे.

## ६. अमंलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या :-

### ६.१. तालुका कृषि अधिकारी :-

६.१.१ कागदपत्रांची छाननी करताना शेतकऱ्याच्या स्वाक्षरीसह शेतकऱ्यांच्या मालकी हक्काचा ७/१२ उतारा, आधार कार्डाची छायांकित प्रत, आधार क्रमांकाशी जोडलेले बँक खाते आहे काय, ऑनलाईन नोंदणी वेळी शेतकऱ्यांने दिलेले बँक खाते क्रमांक व सादर केलेल्या कागदपत्रातील बँक खाते क्रमांक सारखाच आहे काय, यापूर्वी या किंवा इतर योजनेतून लाभ घेतलेला आहे काय, प्राधिकृत अधिकाऱ्याचे संवर्ग प्रमाणपत्र (अ.जा.व अ.ज. शेतकऱ्यांसाठी) आहे काय, इत्यादी व इतर सर्वअनुषंगीक बाबी तपासण्यात याव्यात.

६.१.२ तालुक्यास प्राप्त लक्षांकाच्या अधिन राहून शेतकऱ्यांना पूर्वसंमती पत्र दयावे.

६.१.३ पूर्वसंमती देतांना शेतकऱ्यांना ताकृअ कार्यालयात पाचारण करुन योजनेच्या अटी व शर्ती तसेच कांदाचाळ उभारणीबाबतचे आराखडे व तांत्रिक मापदंड समजावून सांगावे व पूर्वसंमती देते वेळी शेतकऱ्यांकडून विहीत नमून्यात बंधपत्र **(प्रपत्र-३)** भरुन घ्यावे.

६.१.४ सविस्तर अनुदान प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तालुका कृषि अधिकारी यांनी योजनेच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे अनुदान प्रस्ताव तपासून परिपुर्ण असल्याची खात्री करावी.

६.१.५ प्रर्वतकाने कांदाचाळीची उभारणी पुर्ण झाल्यानंतर देयके मंडळ कृषि अधिकारी यांच्या डेस्कला सादर केल्यानंतर मंडळ कृषि अधिकारी यांनी मोका तपासणी करावी व झालेल्या कामांच्या मापन पुस्तिकेत नोंदी कराव्यात. सोबत जोडलेल्या **(प्रपत्र-५)** मध्ये तपासणी अहवाल तयार करावा.

६.१.७ तालुका कृषि अधिकारी यांनी मार्गदर्शक सुचनेनुसार कांदाचाळ उभारणीची कामे तांत्रिकदृष्टया गुणवत्तापूर्ण होण्याच्या दृष्टीने झालेल्या कामाच्या ५० टक्के किंवा किमान ५० कामे आर्थिक वर्षात तपासणी करावी.

### ६.२ उपविभागीय कृषि अधिकारी :-

६.२.१ उपविभागीय कृषि अधिकारी यांनी मार्गदर्शक सुचनेनुसार विहीत मापदंडाप्रमाणे कांदाचाळ उभारणीची कामे तांत्रिकदृष्टया गुणवत्तापूर्ण होण्याच्या दृष्टीने झालेल्या कामाच्या १० टक्के किंवा किमान २५ कामांची तपासणी करावी. उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या अधिनस्त प्रत्येक तालुक्यात तपासणी होईल याची खात्री करावी.

### ६.३ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी :-

६.३.१ जिल्हयास प्राप्त भौतिक व आर्थिक लक्षांकाचे तालुकानिहाय वाटप करण्यात यावे. तालुकानिहाय लक्षांक वाटप करतांना तालुक्यातील कांदा पिकाचे क्षेत्र, खातेदार संख्या, अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती खातेदारांची संख्या इ. बाबी विचारात घेण्यात याव्यात.

६.३.२ कांदाचाळ उभारणीची कामे तांत्रिकदृष्टया गुणवत्तापूर्ण होण्याच्या दृष्टीने ५ टक्के किंवा किमान १० कामांची तपासणी करावी. सदरची तपासणी जिल्हयातील कांदाचाळी उभारणी झालेल्या प्रत्येक तालुक्यात होईल याची खात्री करावी.

६.३.३ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक यांनी ५ टक्के किंवा किमान १० कामांची तपासणी करावी. सदरची कामे ही जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तपासलेल्या कामांव्यतिरीक्त असावीत. तसेच जिल्हयातील कांदाचाळ उभारणी झालेल्या प्रत्येक तालुक्यात असावीत.

६.३.४ विहित लेखा पध्दतीने शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान अदायगीची कार्यवाही करावी.

६.३.५ केंद्र/राज्य/महालेखापाल यांच्या लेखा परिक्षण अहवालातील लेखा आक्षेपांची विहीत मुदतीत पुर्तता करण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहिल.

**६.३ विभागीय कृषि सहसंचालक :-**

६.३.१ विभागीय कृषि सहसंचालक यांनी विभागातील १ टक्का किंवा किमान ५ कामांची तपासणी करावी. विभागातील कांदाचाळी उभारलेल्या प्रत्येक जिल्हयात तपासणी होईल याची खात्री करावी.

६.३.२.तपासणीत गंभीर त्रुटी/उणिवा/अनियमितता आढळून आल्या तर त्याबाबतचा अहवाल तातडीने कृषि आयुक्तालयास सादर करावा.

६.३.३. तपासणी अहवालाचा नमुना सोबत जोडलेला आहे. **( प्रपत्र- ६)**

६.३.४. विभागीय कृषि सहसंचालक यांनी अधिनस्त सर्व कर्मचारी/अधिकाऱ्यांचे तपासणी अहवाल वेळेवर सादर होतील याचे सनियंत्रण व पाठपुरावा करावा.

६.३.५. विभागीय कृषि सहसंचालक यांनी त्यांचे विभागातील भौतिक व आर्थिक प्रगतीचे सनियंत्रण करावे.

**७. सर्वसाधारण सुचना :-**

७.१. ५,१०,१५,२० व २५ मे.टन क्षमतेच्या कांदाचाळींना अनुदान देय राहील. एका लाभार्थ्याला २५ मे.टन क्षमतेच्या कमाल मर्यादपर्यंत अनुदान देय राहील.

७.२. लाभार्थी जर २५ मे.टन पेक्षा अधिक क्षमतेच्या कांदा चाळी उभारणार असेल तर त्यास जास्तीत जास्त २५ मे.टन क्षमतेचे अनुदान देय राहील.

७.३. लाभ घ्यावयाच्या सर्व लाभार्थींनी कांदाचाळ उभारणीच्या निकषाबाबत स्थानिक कृषि अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन/ सूचना घेऊन सदर काम करावयाचे आहे.

७.४ कांदाचाळ उभारणीचा फक्त भांडवली खर्च ग्राहय धरण्यात येईल.

७.५ इच्छुक लाभार्थी/शेतक-यांनी कांदाचाळ उभारणीचे काम मार्गदर्शक सूचनेतील तांत्रिक निकष, आराखडे व दर्जाप्रमाणे करणे बंधनकारक असणार आहे.

७.६ लाभार्थीच्या ७/१२ उताऱ्यावर कांदा पिकाची नोंद असणे आवश्यक आहे. कांदा चाळ उभारणी करावयाची जागा अर्जदाराच्या स्वतःच्या मालकीची असणे आवश्यक आहे.

७.७ सदरील योजना पूर्वसंमती घेऊन नव्याने उभारणी करण्यात येणाऱ्या कांदाचाळ प्रस्तावांना लागू राहील. पूर्वसंमती न घेता उभारणी करण्यात आलेल्या कांदाचाळींना अनुदान देय राहणार नाही.

७.८ प्रकल्पास तालुका कृषि अधिकारी यांनी पूर्वसंमती दिल्यापासुन २ महिन्याच्या आत प्रकल्प पूर्ण करणे आवश्यक आहे.

७.९ आर्थिक मर्यादेच्या अधिन राहूनच पूर्वसंमती देण्यात याव्यात तसेच मंजूर करण्यात आलेल्या निधीपेक्षा अतिरीक्त दायित्व निर्माण करू नये.

Maharashtra State Horticulture & Medicinal Plants Board, Pune

७.१० लाभार्थ्याने सदर प्रकल्पाच्या ठिकाणी कायमस्वरुपी नामफलक लावणे बंधनकारक आहे. नामफलकावर मंडळाच्या **लोगोसह " एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळाच्या अर्थसहाय्याने"** शेतकऱ्याचे नाव, प्रकल्प खर्च आणि प्रकल्प क्षमता असा मजकूर ठळक अक्षरात नमूद करावा.

७.११ एखाद्या लाभार्थीने केंद्र/राज्य शासन/शासनाच्या संस्थेकडून या घटकासाठी अनुदान प्राप्त करुन घेतले असल्यास त्यास या योजनेतून अनुदान देता येणार नाही. केंद्र/राज्य शासन/ शासनाच्या संस्थेकडून लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यास दिलेले अनुदान सव्याज वसूल करण्यात येईल

७.१२ लाभार्थीने अर्थसहाय्य घेतलेली कांदाचाळ किमान ७ वर्षे कार्यान्वित ठेवणे बंधनकारक राहील अन्यथा सदरील रक्कम व्याजासहित वसुलपात्र राहील.

७.१३ पूर्वसंमती पत्र घेते वेळी शेतकऱ्यांस सोबत जोडलेल्या विहीत नमून्यात बंधपत्र **(प्रपत्र - ३)** तालुका कृषि अधिकारी कार्यालयास / डेस्कला सादर करणे बंधनकारक राहील.

७.१४ पूर्वसंमती पत्रासोबत दिलेल्या आराखडयाप्रमाणे (डिझाईन) व तांत्रिक निकषानुसार उभारणी करणे बंधनकारक राहील.

**तांत्रिक सुचना :-**

१. कांदा चाळीच्या छताकरिता ए.सी. शीट, जी.आय. शीट किंवा कौलांचा वापर करावा. जास्तीत जास्त ए.सी. शीटचा वापर करण्यास प्राधान्य दयावे. कारण, ए.सी. शीटचे छत असल्यास चाळीच्या आतील उष्णता व आर्द्रतेचे प्रमाण कमी रहाते व कांदा देखील लवकर सडत नाही.

२. भरपूर सुर्यप्रकाश व खेळती हवा असलेली उंच ठिकाणावर असेलली जागा कांदाचाळ उभारणीसाठी निवडावी.

३. कांदा चाळीची साठवणूकीची जागा **जमिनीपासून किमान ६० से.मी. उंच** असावी. सदर मोकळ्या जागेमध्ये जाड वाळू (भरडा) टाकलेली असावी. तथापि, स्थानिक परिस्थितीनूसार जमिनीपासून ठेवावयाच्या उंचीमध्ये बदल करण्यास हरकत नाही.

४. कांदा चाळीची लांबीची दिशा **दक्षिण - उत्तर** असावी, जेणेकरुन कांदा चाळीमध्ये जास्तीत जास्त हवा खेळती रहाण्यास मदत होईल. तथापि, जास्त पर्जन्यमान असणाऱ्या ठिकाणी कांदा चाळीच्या लांबीची दिशा **पुर्व - पश्चिम** ठेवण्यात यावी.

५. कांदा चाळीसाठी तळाशी किंवा बाजूच्या भिंतींना क्रॉंक्रीट वापरण्यात येऊ नये त्याऐवजी जीआय लिंक जाळी किंवा लाकडी बॅटम पट्टयांचा किंवा बांबूचा वापर करावा.

६. कांदा चाळीवर टाकण्यात आलेले छताचे पत्रे चाळीच्या बांधकामापेक्षा १ मीटर लांब असावेत व छताचा कोन २२ अंश इतका असावा.

७. पावसाळयामध्ये कांदा चाळीच्या दोन्ही बाजूस बारदान लावावे जेणेकरुन कांदा चाळींमधील कांदा जास्तीत जास्त दिवस सुस्थितीत राहील.

संचालक
**महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी व वनस्पती मंडळ, पुणे-५**


# कांदाचाळ बांधकामाचे

# अंदाजपत्रक व नकाशा

Maharashtra State Horticulture • Medicinal Plants Board, Pune •

# ESTIMATE FOR ONION STORAGE OF CAPACITY 5 M.T.


| Sr. No. | Description | No. | L(M) | B(M) | D/H | Qty. | UNIT | Rate | Amount (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Excavation | 8 | 0.9 | 0.9 | 1 | 6.48 | L.H. | 125/- | 810.00 |
| 2 | P.C.C. (1:4:8) | 8 | 0.9 | 0.9 | 0.15 | 0.972 | Cu. M. | 4000/- | 3888.00 |
| 3 | Footing (1:1:5:3) | 8 | 0.6 | 0.6 | 0.3 | 0.864 | Cu. M. | 4500/- | 3888.00 |
| 4 | Columns | 8 | 0.23 | 0.23 | 1 | 0.423 | Cu. M. | 4500/- | 1903.50 |
| 5 | Reinforcement Steel | | | | | 60 | Kg | 60/- | 3600.00 |
| 6 | Structural Steel | | | | | 160 | Kg | 60/- | 9600.00 |
| 7 | AC Sheet | 2 | 4 | 2 | | 16 | Sq. M. | 300/- | 4800.00 |
| 8 | Ridge | 1 | 4 | | | 4 | Rmt | 250/- | 1000.00 |
| 9 | 2" Dia.1/2 Bamboo Strips@3" C/C. | | | | | 300 | Rmt | 20/- | 6000.00 |
| | **Total** | | | | | | | | **35489.50** |




Maharashtra State Horticulture & Medicinal Plants Board, Pune

# ESTIMATE FOR ONION STORAGE OF CAPACITY 10 M.T.


| Sr. No. | Description | No. | L(M) | B(M) | D/H | Qty. | UNIT | Rate | Amount (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Excavation | 16 | 0.9 | 0.9 | 1 | 12.96 | L.H. | 125/- | 1620.00 |
| 2 | P.C.C. (1:4:8) | 16 | 0.9 | 0.9 | 0.15 | 1.944 | Cu. M. | 4000/- | 7776.00 |
| 3 | Footing (1:1:5:3) | 16 | 0.6 | 0.6 | 0.3 | 1.728 | Cu. M. | 4500/- | 7776.00 |
| 4 | Columns | 16 | 0.23 | 0.23 | 1 | 0.846 | Cu. M. | 4500/- | 3807.00 |
| 5 | Reinforcement Steel | | | | | 120 | Kg | 60/- | 7200.00 |
| 6 | Structural Steel | | | | | 320 | Kg | 60/- | 19200.00 |
| 7 | AC Sheet | 4 | 4 | 2 | | 32 | Sq. M. | 300/- | 9600.00 |
| 8 | Ridge | 2 | 4 | | | 8 | Rmt | 250/- | 2000.00 |
| 9 | 2" Dia.1/2 Bamboo Strips@3" C/C. | | | | | 600 | Rmt | 20/- | 12000.00 |
| | **Total** | | | | | | | | **70979.00** |




Maharashtra State Horticulture & Medicinal Plants Board, Pune

# ESTIMATE FOR ONION STORAGE OF CAPACITY 15 M.T.


| Sr. No. | Description | No. | L(M) | B(M) | D/H | Qty. | UNIT | Rate | Amount (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Excavation | 24 | 0.9 | 0.9 | 1 | 19.44 | L.H. | 125/- | 2430.00 |
| 2 | P.C.C. (1:4:8) | 24 | 0.9 | 0.9 | 0.15 | 2.916 | Cu. M. | 4000/- | 11664.00 |
| 3 | Footing (1:1:5:3) | 24 | 0.6 | 0.6 | 0.3 | 2.592 | Cu. M. | 4500/- | 11664.00 |
| 4 | Columns | 24 | 0.23 | 0.23 | 1 | 1.270 | Cu. M. | 4500/- | 5715.00 |
| 5 | Reinforcement Steel | | | | | 180 | Kg | 60/- | 10800.00 |
| 6 | Structural Steel | | | | | 480 | Kg | 60/- | 28800.00 |
| 7 | AC Sheet | 6 | 4 | 2 | | 48 | Sq. M. | 300/- | 14400.00 |
| 8 | Ridge | 3 | 4 | | | 12 | Rmt | 250/- | 3000.00 |
| 9 | 2" Dia.1/2 Bamboo Strips@3" C/C. | | | | | 900 | Rmt | 20/- | 18000.00 |
| | **Total** | | | | | | | | **106473.00** |




Maharashtra State Horticulture & Medicinal Plants Board, Pune


# ESTIMATE FOR ONION STORAGE OF CAPACITY 20 M.T.

| Sr. No. | Description | No. | L(M) | B(M) | D/H | Qty. | UNIT | Rate | Amount (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Excavation | 28 | 0.9 | 0.9 | 1 | 22.68 | L.H. | 125/- | 2835.00 |
| 2 | P.C.C. (1:4:8) | 28 | 0.9 | 0.9 | 0.15 | 3.402 | Cu. M. | 4000/- | 13608.00 |
| 3 | Footing (1:1:5:3) | 28 | 0.6 | 0.6 | 0.3 | 3.024 | Cu. M. | 4500/- | 13608.00 |
| 4 | Columns | 28 | 0.23 | 0.23 | 1 | 1.481 | Cu. M. | 4500/- | 6664.50 |
| 5 | Reinforcement Steel | | | | | 240 | Kg | 60/- | 14400.00 |
| 6 | Structural Steel | | | | | 640 | Kg | 60/- | 38400.00 |
| 7 | AC Sheet | 8 | 4 | 2 | | 64 | Sq. M. | 300/- | 19200.00 |
| 8 | Ridge | 4 | 4 | | | 16 | Rmt | 250/- | 4000.00 |
| 9 | 2" Dia.1/2 Bamboo Strips@3" C/C. | | | | | 1200 | Rmt | 20/- | 24000.00 |
| | Total | | | | | | | | 136715.50 |



# ESTIMATE FOR ONION STORAGE OF CAPACITY 25 M.T.

| Sr. No. | Description | No. | L(M) | B(M) | D/H | Qty. | UNIT | Rate | Amount (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Excavation | 36 | 0.9 | 0.9 | 1 | 29.16 | L.H. | 125/- | 3645.00 |
| 2 | P.C.C. (1:4:8) | 36 | 0.9 | 0.9 | 0.15 | 4.374 | Cu. M. | 4000/- | 17496.00 |
| 3 | Footing (1:1:5:3) | 36 | 0.6 | 0.6 | 0.3 | 3.888 | Cu. M. | 4500/- | 17496.00 |
| 4 | Columns | 36 | 0.23 | 0.23 | 1 | 1.904 | Cu. M. | 4500/- | 8568.00 |
| 5 | Reinforcement Steel | | | | | 300 | Kg | 60/- | 18000.00 |
| 6 | Structural Steel | | | | | 800 | Kg | 60/- | 48000.00 |
| 7 | AC Sheet | 10 | 4 | 2 | | 80 | Sq. M. | 300/- | 24000.00 |
| 8 | Ridge | 5 | 4 | | | 20 | Rmt | 250/- | 5000.00 |
| 9 | 2" Dia.1/2 Bamboo Strips@3" C/C. | | | | | 1500 | Rmt | 20/- | 30000.00 |
| | **Total** | | | | | | | | **172205.00** |



# अर्ज / करारनामा /प्रपत्रे / तपासणी अहवाल इत्यादींचे प्रपत्र

## प्रपत्र- १

## मान्यतापुर्व स्थळपाहणी अहवाल (पुर्वसंमती देण्यापुर्वी)

:-

दिनांक:-

**१) लाभार्थ्याचे नाव (आडनाव प्रथम) :-**.....................................................................................

मु.पो. ............................... ता. ..................................... जि. ...................................

पिनकोड:-..................... मोबाईल नं:-........................ ई-मेल आय डी :- ................................

**२) लाभार्थी प्रकार :- .....................................................** (शेतकरी / महिला शेतकरी)

**३) लाभार्थी वर्गवारी :- .........................................** (अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती/ इतर)

**४) कांदाचाळ उभारणी करावयाच्या ठिकाणाचा पत्ता :-** सर्व्हे नं. (हिस्सा / पोट हिस्सासह).......................

मु.पो. ............................... ता. ..................................... जि. ...................................

पिनकोड:-.....................

५) कांदा लागवडीखालील क्षेत्र ........... हे. असून येणारे अंदाजित उत्पादन ............. मे.टन होईल.

६) उभारणी करावयाच्या कांदाचाळीची क्षमता :- ......................... मे.टन

७) प्रस्तावित बांधकामाचे क्षेत्रफळ :- ............... चौ.मी. (लांबी :- ........ मी. रूंदी :- ........ मी.)

८) लाभार्थीने सदर क्षेत्रावर यापुर्वी शासकीय योजनेतून कांदाचाळ उभारणी केली आहे काय ? (होय/नाही)

९) कांदाचाळी करीता निवड केलेली जागा योग्य असल्याबाबत दाखला -

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती .......................................................................

मु.पो. ............................... ता. ..................................... जि. ......................................

पिनकोड:-..................... यांनी .................................. योजनेअंतर्गत सन ..........................
मध्ये कांदाचाळ घटक उभारणीच्या दृष्टीने योग्य / अयोग्य असून प्रकल्प उभारणी करणे करीता पुर्वसंमती देणेकरीता शिफारस करण्यात येत आहे / नाही.

**स्थळ :-**

**दिनांक:-**

स्वाक्षरी - ........................................

कृषी सहाय्यक ...................................

सजा..................................................

ता................ जि. ..........................

लाभार्थीचे नाव - ..............................................

स्वाक्षरी - ......................................................

प्रपत्र-२

# हमीपत्र

मी/आम्ही

श्री./श्रीमती...................................................................................

मु.पो.................. ता....................जि.................... हमीपत्र लिहून देतो/देते की,

१) सन ----------- मध्ये मी/आम्ही सर्व्हे नं./गट नं.......गाव............. तालुका .......... मध्ये .... मे.टन क्षमतेची कांदाचाळ उभारणीसाठी प्रकल्प प्रस्ताव महाडीबीटी पोर्टलद्वारे तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे सादर करीत आहे/आहोत. माझ्याकडे/ आमच्याकडे कांदापिकाखाली एकुण ....... हे. क्षेत्र आहे. मी/आम्ही किंवा माझ्या/आमच्या कुटुंबातील इतर व्यक्तींनी कांदाचाळ उभारणी या घटकासाठी यापुर्वी कुठल्याही शासकीय योजनेमधून अर्थसहाय्य घेतलेले नाही.

२) मी/आम्ही कांदाचाळ उभारणी घटकाच्या शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना/तांत्रिक निकषानुसार प्रकल्प पूर्ण करील/करु.

३) कांदाचाळीचा दुरुपयोग होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी माझी/आमची राहील.

४) कांदाचाळीची नैसर्गिक आपत्ती अथवा इतर कारणांनी नुकसान झाल्यास शासनाकडे नुकसान भरपाई मागणार नाही.

५) अर्थसहाय्य मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पुर्वपरवानगी शिवाय मी/आम्ही संपुर्ण प्रकल्पाची किंवा त्याच्या काही भागाची जागा बदलणार नाहीत किंवा प्रकल्पाच्या लक्षणीय भागाची विल्हेवाट लावणार नाही.

६) प्रकल्पाच्या कामकाजाची कोणत्याही वेळेस तपासणी करणे व त्यासाठी प्रकल्पाच्या आवारात प्रवेश करणे यासाठी मला/आम्हास अर्थसहाय्य मंजूर करणारे अधिकारी, अनुदान अदा करणारे अधिकारी, राज्य शासन व त्यांनी प्राधिकृत केलेली व्यक्ती यांना प्रतिबंध करणार नाही तसेच त्यांनी या प्रकल्पाशी संबंधित कागदपत्रे, नोंदवह्या, पुस्तके व हिशोबाच्या कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी व त्याच्या प्रती देण्यास प्रतिबंध करणार नाही.

७) यदाकदाचित माझ्या/आमच्याकडून खोटी, चुकीची किंवा अपुर्ण माहिती दिल्याचे आढळून आल्यास, **कमी खर्चाचे कांदाचाळ उभारणी हा घटक** राबविण्याबाबतच्या योजनेअंतर्गत कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास तसेच दिलेल्या अनुदानाचा गैरवापर केल्याचे आढळून आल्यास मला/आम्हास माझे/आमचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर आवश्यकता भासल्यास मला/आम्हाला दिलेल्या अर्थसहाय्याची पूर्ण रक्कम अथवा त्याचा हिस्सा अर्थसहाय्य अदा केल्याच्या दिनांकापासून शासन निर्धारित करील त्या दराने व पद्धतीने वार्षिक व्याजासह वसूल करु शकतील याची मला/आम्हाला जाणीव आहे. त्याप्रमाणे मी/आम्ही ते अनुदान परत करु त्याबद्दल आमची काहीही तक्रार राहणार नाही.

८) शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या अटी व शर्ती माझ्यावर/आमच्यावर बंधनकारक राहतील याची मला/आम्हास जाणीव आहे व त्याचे मी/आम्ही पालन करीन/करु. प्रकल्पाच्या ठिकाणी नामफलक लावून त्यावर ठळक अक्षरात **लोगोसह " एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळाच्या अर्थसहाय्याने"** शेतकऱ्याचे नाव, प्रकल्प खर्च आणि प्रकल्प क्षमता असा मजकूर नमूद करु याची मी/आम्ही हमी देतो.

९) उपरोक्त योजनेतंर्गत मिळणाऱ्या अर्थसहाय्याचा प्रकार हा प्रोत्साहनात्मक असल्यामुळे देय किंवा उपलब्ध होणारे अनुदान मला/आम्हास मान्य असेल व त्यासाठी मी न्यायालयात कोणत्याही प्रकारचा दावा दाखल करणार नाही.

१०) वरीलप्रमाणे सादर केलेली माहिती खरी व बरोबर असून ती खोटी व चुकीची आढळून आल्यास मला अदा



Maharashtra State Horticulture & Medicinal Plants Board, Pune

करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची पूर्ण रक्कम अथवा त्याचा हिस्सा अर्थसहाय्य अदा केल्याच्या दिनांकापासून महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे, महाराष्ट्र राज्य निर्धारित करेल त्या दराने व पध्दतीने वार्षिक व्याजासह वसुल करू शकतील. याची मला/आम्हास जाणीव असून ते माझ्या/आमच्यावर बंधनकारक राहील.

**लाभार्थीची/लाभार्थ्यांच्या स्वाक्षरी/स्वाक्षऱ्या**

**(नाव व पत्यासह)**

वरीलप्रमाणे सादर केलेली माहिती खरी आहे.

साक्षीदार क्र. १

पत्ता..............................................स्वाक्षरी.................

साक्षीदार क्र. २

पत्ता..............................................स्वाक्षरी.................

**(तालुका कृषि अधिकारी यांनी पूर्वसंमती पत्र देण्यापूर्वी लाभार्थ्यांने पोर्टलवर अपलोड केल्याची खात्री करावी.)**

## प्रपत्र-३

# बंधपत्र

**(पूर्वसंमती पत्र घेतांना शेतकऱ्यांने भरुन द्यावयाचे बंधपत्र)**

मी/आम्ही श्री./श्रीमती/मेसर्स .................................................................... मु.पो. ......................... ता. ................... जि. ..................... या बंधपत्राद्वारे लिहून देतो की, पूर्वसंमती पत्र घेतेवेळी .... मे.टन क्षमतेची कांदाचाळ उभारणी या घटकांच्या मार्गदर्शक सूचना, अटी/शर्ती, आराखडा, तांत्रिक निकष अंदाजपत्रक इ.बाबी मला/आम्हाला समजावून सांगण्यात आलेल्या आहेत. पूर्वसंमती पत्रासोबत आराखडा, तांत्रिक निकष अंदाजपत्रक इत्यादी बाबी मला/ आम्हाला प्राप्त झालेल्या आहेत. मी/आम्ही उपरोक्त मार्गदर्शक सूचना, अटी/शर्ती, आराखडा, तांत्रिक निकष या बाबीनुसार प्रकल्पाचे काम पूर्ण करील/करु. उपरोक्त बाबींनुसार मी/आम्ही प्रकल्पाचे काम न केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित घटकाचे अनुदान मिळण्यास मी/आम्ही पात्र राहणार नाही. याची मला/आम्हाला जाणीव आहे. मी/आम्ही किंवा माझ्या/आमच्या कुटुंबातील इतर व्यक्तींनी या पुर्वी कुठल्याही शासकीय योजनेतून कांदाचाळ या घटकासाठी अर्थसहाय्य घेतलेले नाही.

(लाभार्थी स्वाक्षरी)

स्थळ:-

दिनांक:- लाभार्थ्याचे नाव, पत्ता व भ्रमनध्वनी क्रमांक

**(तालुका कृषि अधिकारी यांनी पूर्वसंमती पत्र देण्यापूर्वी लाभार्थ्यांने पोर्टलवर अपलोड केल्याची खात्री करावी.)**

Maharashtra State Horticulture & Medicinal Plants Board, Pune

प्रपत्र-४

# पूर्वसंमती पत्र

**(राष्ट्रीय फलोत्पादन अभियान / राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत कांदाचाळ उभारणी या घटकासाठी द्यावयाच्या पुर्वसंमती पत्राचा नमूना)**

जा.क्र. -----------------

कार्यालय - तालुका कृषि अधिकारी, ---

जिल्हा ----------

दिनांक -

प्रति,

श्री/श्रीमती------------------

मु.पो.------------तालूका ----------- जिल्हा -----------

आपल्या महाडीबीटी पोर्टलवरील अर्ज क्र. ............................... आपले सर्व्हे नं./गट नं. ------ मध्ये .... मे.टन क्षमतेची **कांदाचाळ उभारणीसाठी** राष्ट्रीय फलोत्पादन अभियान / राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत पूर्वसंमती देण्यात येत आहे. आपण सादर केलेल्या हमीपत्रात या पूर्वी कांदाचाळ उभारणी या घटकासाठी लाभ घेतला नसल्याचे नमूद केलेले आहे. मार्गदर्शक सूचनांनूसार व आपल्या मागणीनूसार आता कांदाचाळ उभारणी या घटकासाठी पूर्वसंमती देण्यात येत आहे. सदरचे पूर्वसंमतीपत्र दिल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत आपण प्रकल्पाचे काम सुरु करावे. तसेच दोन महिन्याच्या आत कांदाचाळ उभारणीचे काम पुर्ण करुन देयके महाडीबीटी पोर्टलद्वारे मंडळ कृषी अधिकारी यांच्या डेस्कला सादर न केल्यास संगणकीय प्रणालीद्वारे सदर प्रस्तावाची पुर्वसंमती रद्द होईल. कांदाचाळ उभारणी झाल्यानंत दोन महिन्यात देयके सादर न केल्यास आपणास अनुदान मागणीचा हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कांदाचाळ उभारणीच्या तांत्रिक निकषासह आराखडा (डिझाईन) व अंदाजपत्रक सोबत जोडले आहे. कांदाचाळ उभारणी सदर तांत्रिक निकषाप्रमाणे व आराखड्याप्रमाणे असेल तरच आपला प्रस्ताव अनुदानासाठी पात्र राहिल याची नोंद घ्यावी. आपला प्रस्ताव मंजूर झाल्यास आपणास शासन निर्णयानुसार (मार्गदर्शक सुचना व मंजूर मापदंड इत्यादी) अनुज्ञेय अर्थसहाय्य निधी उपलब्धतेनूसार मंजूर करण्यात येईल. तसेच सदरचे अर्थसहाय्य आपल्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल. आपल्या प्रकल्प प्रस्तावास मंजूरी देणे, देय अर्थसहाय्याची रक्कम/देय कालावधी इत्यादी बाबी ठरविण्याचा अंतिम अधिकार शासनाचा राहिल.

**सोबतः**

१. आराखडा (Design)
२. अंदाजपत्रक

Maharashtra State Horticulture and Medicinal Plants Board, Pune

**तालुका कृषि अधिकारी,**

**-------- जिल्हा -----**

## प्रपत्र- ५

# कांदाचाळ उभारणी पश्चात मोका तपासणी अहवाल

१. तपासणी दिनांक :-

२. तपासणी अधिकारी यांचे नाव :- श्री. ...................................... मंडळ कृषि अधिकारी ..................

३.लाभार्थ्यांचे नाव - श्री. ........................................................................................

गांव ............................ ता. ......................... जि. ....................

सर्व्हे नं/ गट नं..................... वर्गवारी-( अ.जा./अ.ज./सर्वसाधारण).......................

४. बाब- कांदाचाळ उभारणी (क्षमता - ........ मे. टन)

५. प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील

५.१ कांदाचाळीचे मोजमापे

| अ.क्र. | बाब | आराखडयानुसार अपेक्षित (मी.) | | | | | प्रत्यक्ष (मी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५ मे.टन | १० मे.टन | १५ मे.टन | २० मे.टन | २५ मे.टन | |
| १ | एका चाळीची लांबी | ४.५० | ४.५० | ७.२५ | ९.६० | १२ | |
| २ | दुसऱ्या चाळीची लांबी | - | ४.५० | ७.२५ | ९.६० | १२ | |
| ३ | एका चाळीची रुंदी | १.५० | १.५० | १.२० | १.२० | १.२० | |
| ४ | दुसऱ्या चाळीची रुंदी | - | १.५० | १.२० | १.२० | १.२० | |
| ५ | दोन चाळीतील अंतर | - | १.५० | १.५० | १.५० | १.५० | |
| ६ | मध्य भागाची जमिनीपासून उंची | ३.३० | ३.३० | ३.४० | ३.४० | ३.४० | |

५.२ कांदाचाळीच्या पायाचे बांधकाम मार्गदर्शक सुचनेतील आराखडयाप्रमाणे आहे काय? होय/नाही

५.३ कांदाचाळीच्या तळाशी व बाजूभिंतीस वापरलेले साहित्य (लाकडी बॅटम पट्टी/ चेनलिंक जाळी) = ............

५.४ छतासाठी वापरलेले साहित्य (जीआय शीट/ एसी शीट/ कवले) = ............

५.५ कांदाचाळीचे छत बाजू बांधकामापेक्षा १ मीटर लांब आहे काय? होय/नाही

उभारणीसाठी वापरलेल्या साहित्याचा तपशील-(मजुरीसहीत)

| अ. क्र. | बाब | एकक | मापदंडाप्रमाणे शिफारशीत परिमाण | | | | | बिलाप्रमाणे वापरलेले परिमाण | दर | देयकाप्रमाणे किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ५ मे.टन | १० मे.टन | १५ मे.टन | २० मे.टन | २५ मे.टन | | | |
| १ | Excavation | Cu.M. | 6.48 | 12.96 | 19.44 | 22.68 | 29.16 | | | |
| २ | P.C.C. (1:4:8) | Cu.M. | 0.972 | 1.944 | 2.916 | 3.402 | 4.374 | | | |
| ३ | Footing (1:1:5:3) | Cu.M. | 0.864 | 1.728 | 2.592 | 3.024 | 3.888 | | | |
| ४ | Columns | Cu.M. | 0.423 | 0.846 | 1.270 | 1.481 | 1.904 | | | |
| ५ | Reinforcement Steel | Kg | 60 | 120 | 180 | 240 | 300 | | | |
| ६ | Structural Steel | Kg | 160 | 320 | 480 | 640 | 800 | | | |
| ७ | AC Sheet | Sq.M. | 16 | 32 | 48 | 64 | 80 | | | |
| ८ | Ridge | Rmt | 04 | 08 | 12 | 16 | 20 | | | |
| ९ | 2" Dia.1/2 Bamboo Strips@3" C/C. | Rmt | 300 | 600 | 900 | 1200 | 1500 | | | |
| | एकुण | | | | | | | | | |

वरील तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे साहित्य मोक्यावर वापरले असल्याबाबत खात्री करावी. साहित्य व मजुरीच्या देयकाची (बिलाची) पडताळणी प्रत्यक्ष केलेल्या कामासोबत करावी.

Maharashtra State Horticulture & Medicinal Plants Board, Pune

६. उपरोक्त तक्त्याप्रमाणे वापरण्यात आलेल्या साहित्य व मजुरीची एकुण किंमत (प्रत्यक्ष खर्च) रु............ (अ)
७.मार्गदर्शक सुचनेनुसार प्रति मे.टन रु.७०००/- प्रमाणे ग्राहय खर्च मर्यादा (...... मे.टन X ७०००) =
रु. .................... (ब)
८. उपरोक्त ६ व ७ पैकी कमी असलेली खर्च किंमत रु. .............. (क)
९. अनुज्ञेय अर्थसहाय्य (क ÷ २) (५० टक्केप्रमाणे) रु. .................

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त ..... मे.टन क्षमतेचा कांदाचाळ उभारणीचा प्रकल्प मार्गदर्शक सुचनांनुसार पुर्ण झालेला असुन प्रकल्पाच्या किंमती बाबत प्रत्यक्ष देयकावरुन खात्री करण्यात आलेली आहे. सबब उपरोक्त लाभार्थ्यास ५० टक्के रक्कम रु. ................ अक्षरी रु. ....................................... अर्थसहाय्य मंजुर करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

लाभार्थ्याचे नाव व स्वाक्षरी

तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व स्वाक्षरी
श्री. .........................................
मंडळ कृषि अधिकारी. ....................... (स्वाक्षरी)

## प्रपत्र- ६

## कांदाचाळ उभारणी पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

१. तपासणी दिनांक :-

२. तपासणी अधिकारी :- श्री. ............................................ पदनाम ......................

तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी / सदस्य :-

१. श्री. ........................................................... पदनाम ......................................

२. श्री. ........................................................... पदनाम ......................................

३.लाभार्थ्याचे नाव - श्री. ...........................................................

गांव ........................... ता. ......................... जि. .............

सर्व्हे नं/ गट नं.................... वर्गवारी- ( अ.जा./अ.ज./सर्वसाधारण)......................

४. बाब- कांदाचाळ उभारणी (क्षमता - ......... मे. टन)

५. प्रकल्पचा मोका तपासणी तपशील

५.१ कांदाचाळीचे मोजमापे

| अ.क्र. | बाब | आराखडयानुसार अपेक्षित (मी.) | | | | | प्रत्यक्ष (मी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५ मे.टन | १० मे.टन | १५ मे.टन | २० मे.टन | २५ मे.टन | |
| १ | एका चाळीची लांबी | ४.५० | ४.५० | ७.२५ | ९.६० | १२ | |
| २ | दुसऱ्या चाळीची लांबी | - | ४.५० | ७.२५ | ९.६० | १२ | |
| ३ | एका चाळीची रुंदी | १.५० | १.५० | १.२० | १.२० | १.२० | |
| ४ | दुसऱ्या चाळीची रुंदी | - | १.५० | १.२० | १.२० | १.२० | |
| ५ | दोन चाळीतील अंतर | - | १.५० | १.५० | १.५० | १.५० | |
| ६ | मध्य भागाची जमिनीपासून उंची | ३.३० | ३.३० | ३.४० | ३.४० | ३.४० | |

५.२ कांदाचाळीच्या पायाचे बांधकाम मार्गदर्शक सुचनेतील आराखडयाप्रमाणे आहे काय? होय/नाही

५.३ कांदाचाळीच्या तळाशी व बाजूभिंतीस वापरलेले साहित्य (लाकडी बॅटम पट्टी/ चेनलिंक जाळी) = ............

५.४ छतासाठी वापरलेले साहित्य (जीआय शीट/ एसी शीट/ कवले) = ............

५.५ कांदाचाळीचे छत बाजू बांधकामापेक्षा १ मीटर लांब आहे काय? होय/नाही

५.६ कांदाचाळीमध्ये कांदा साठविण्यात आला आहे काय? होय/नाही

५.७ नसल्यास थोडक्यात कारण

५.८ कांदाचाळीवर योजनेचा कायमस्वरुपी फलक लावलेला आहे काय? होय/नाही

६. कांदाचाळ कामाच्या गुणवत्तेबाबत थोडक्यात अभिप्राय

तपासणी अधिकारी, श्री. ........................................

पदनाम. ............................................ (स्वाक्षरी)

इतर अधिकारी श्री. ............................................

पदनाम. ............................................ (स्वाक्षरी)

Maharashtra State Horticulture & Medicinal Plants Board Pune